
# श्री. सुबोध गोखले यांचे सुलेखन



"बोलकी अक्षरे..."

आज धुलवडीचा आनंदमयी रंगांची मुक्त हस्ते उधळण करणारा क्षण... आणि योगायोग असा की ह्या क्षणाचे औचित्य साधून मी अक्षरलेखनांतून आपणांस ही अक्षररूपी स्नेहमय पत्रभेट देत आहे.

एका अक्षरमित्राला

अक्षरपत्र

बोलकी अक्षरे...

"अक्षरमित्र प्रल्हादजी कायंदे"

सप्रेम नमस्कार..

अक्षरांचे सुंदर-सुंदर शब्द बनतात आणि त्यातूनच त्यांचा सुंदर गोफ विणला जातो. अगदी असेच आहे आपले व्यक्तिमत्व.

आपण मोत्यासारख्या सुंदर अक्षरांमधून जिवलग मित्रांच्या अजोड असा मित्रसमूह बनवता की तो पुरुष असो वा स्त्री आपल्या अक्षराच्या प्रेमातच पडला पाहिजे.


सुंदर अशा अलंकारिक अक्षरनिर्मितीतून आपण जे स्नेहमयी भावबंध निर्माण करता त्याला तोड नाही.


फेसबुकसारख्या आभासी जगांतील आपण दोघे, ह्या अक्षरलेखनाच्या आवडीतून आत्तापर्यंत एकदाही प्रत्यक्ष न भेटता अक्षरमित्र कधी झालो हे कळलेच नाही. हीच तर ह्या जादूभरी अक्षरलेखनाची खरी गंमत आहे.


आपण देऊळगावराजा ह्या गावचे तर मी पुण्याचा.. पण आपल्या दोघांच्या अक्षरलेखनाच्या एक अनोखा स्नेहबंध निर्माण झाला हे मात्र अगदी खरे आहे. अक्षरांना वळण देऊन त्यातून आपण जी अक्षरनिर्मिती करता त्याला तोड नाही. आपल्या हातून अशीच सुंदर अक्षरचित्रे निर्माण होवोत आणि त्याचा मनमुराद आनंद आम्हा रसिकांना लुटता येवो हीच त्या परमात्म्याकडे प्रार्थना !!


आपला अक्षरमित्र.. सुबोध के. गोखले

सोमवार.. २९.०३.२०२१


शुभ दीपावली
लक्ष्य लक्ष्य दिव्यांनी
उजळू दे आकाश...
होऊ दे साऱ्या दुष्ट शक्तिंचा विनाश,
मिळो सर्वांना प्रगतीच्या
पाऊलवाटेवरील प्रकाश...
असा साजरा होवो...
आपला
सर्वांचा
दिवाळी सण खास !!
सोमवार:: २४.१०.२०२२


प्रयत्न माझा नेहमी एवढाच असतो...
चांगल्या माणसांची एक साखळी तयार व्हावी.
आपण कधी भेट अगर न भेटू, पण..
आपले चांगले विचार एकमेकांना
नक्की भेटत रहातील.
माझी माणसं हिच माझी गर्भश्रीमंती !!
लोक म्हणतात...
जगण्यासाठी पैसा लागतो,
अहो.. पैसा तर व्यवहारासाठी लागतो.
जगण्यासाठी लागतात फक्त..
"प्रेमाची माणसं" अगदी तुमच्यासारखी !!
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..
आपल्याला व आपल्या
कुटुंबियांना...
दीपावली शुभेच्छा
दिवाळी पाडवा.. एक आनंदसोहळा !!
सुलेखन: सुबोध केशव गोखले
शुक्रवार, ०५ नोव्हेंबर २०२१


थांबला पाऊस उजळे आकाश
थांबला पाऊस उजळे आकाश
सूर्य येई ढगांतून उधळी प्रकाश
किरण कोवळे भूमीवरी आले
सोनेरी त्या तेजामध्ये वस्तुजात खुले
सुस्नात जाहली धरणी हांसली
वरुणाच्या कृपावर्षावाने संतोषली...
शांता शेळके...


नवरात्रोत्सव
घटस्थापनेतला
घ
घटस्थापना म्हणजे
नवरात्रोत्सवाची सुरुवात करणारा
एक महत्वाचा विधी आहे.
ज्यामध्ये
देवी दुर्गामातेचे
आवाहन केले जाते आणि
तिच्या आराधनेसाठी
मातीचा घट (कलश)
स्थापित केला जातो.
कळली
नऊ
रूपांची
आराधना..
झाली आज
घटाची
स्थापना.
घटस्थापना..
सोमवार
२२ सप्टेंबर २०२५
हार्दिक शुभेच्छा..
सुबोध गोखले